सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २४ सप्टेंबर २०२६

आतील पानावर

पान २– ती ममता कधीच मेली...
पान ३– सलमान साकारणार 'कर्णा'ची भूमिका?
पान ४– रश्मिकाच्या हाती लागला मोठा प्रोजेक्ट!
पान ५– 'मॅगझिन' सिनेमाचा फर्स्ट लूक चर्चेत
पान ६ – श्रिया आता 'हैवान'मध्ये दिसणार

# नयनतारा दिसणार देवी अवतारात



दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अभिनेत्री नयनतारा हिच्या 'महाशक्ती' या बहुप्रतीक्षित सिनेमाची अनेकजण आतुरतेने वाट पाहत आहे. याच दरम्यान, या सिनेमाचा टीझर रिलीज झाला आहे. यातील तिच्या लुकने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. नयनताराचा लूक, अभिनयाची झलक आणि सिनेमाची भव्यता पाहता 'महाशक्ती' हा सिनेमा मोठ्या पडद्यावर खास ठरण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, नयनताराचा हा अवतार तिच्या याआधीच्या भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळा असल्याचे पाहायला मिळत आहे. 'महाशक्ती'चा संबंध 'हनुमान अंश' या सिनेमाच्या विश्वाशी असल्यामुळे चाहत्यांमध्ये या सिनेमाबद्दल विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. नयनतारा या सिनेमात दैवी शक्तीशी जोडलेल्या भूमिकेत दिसणार आहे. 'हनुमान अंश' या चित्रपटाने देवभक्ती आणि आस्थेच्या जोरावर प्रेक्षकांची मनं जिंकल्यानंतर आता मोठ्या पडद्यावर आणखी एका देवी शक्तीचे आगमन होणार असल्याने अनेकांची उत्सुकता वाढली आहे. 'महाशक्ती'च्या टीझरमध्ये व्हिज्युअल्स, भव्य सीन्स आणि रहस्याने भरलेल्या जगाची झलक पाहायला मिळते. 'महाशक्ती'साठी निर्मात्यांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली आहे. हा चित्रपट नोव्हेंबरमध्ये हिंदी, तमिळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड या पाच भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. उत्तर भारतात या चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी 'एए फिल्म्स' सांभाळणार आहे. 'हनुमान अंश' या चित्रपटानेही आस्था आणि अध्यात्मावर आधारित कथेच्या जोरावर बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी केली. आता 'महाशक्ती'च्या टीझरने पुन्हा धार्मिक आणि आध्यात्मिक कथांबद्दल प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे. दोन्ही चित्रपटांची कथा आणि पात्रे भिन्न असली, तरी आस्था आणि शक्ती हे दोन्ही चित्रपटांमधील मुख्य घटक आहेत. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित होणारा नयनताराचा 'महाशक्ती' प्रेक्षकांवर किती प्रभाव पाडतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.



# ती ममता कधीच मेली..



बॉलिवूडच्या हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेत्री ममता कुलकर्णी १९९०च्या दशकात अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये झळकली. आपल्या अभिनयासोबतच सौंदर्य आणि अदांनी तिने प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली. मात्र, अनेक वर्षांनंतर भारतात परतल्यानंतर ममता सिनेसृष्टीपासून दूर असून भक्तीमध्ये रमल्याचं पाहायला मिळत आहे. नुकत्याच मुंबईत झालेल्या एका दहीहंडी कार्यक्रमात तिने स्वतःच्याच गाण्यावर परफॉर्म करण्यास नकार दिला. मुंबईत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला गोविंदा यांच्यासह अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. ममता कुलकर्णीही या कार्यक्रमात सहभागी झाली होती. यावेळी स्टेजवर तिला तिच्या 'करण अर्जुन' या चित्रपटातील 'राणा जी माफ करना' या गाण्यावर परफॉर्म करण्यास सांगण्यात आलं होतं. मात्र, तिने त्यासाठी स्पष्टपणे नकार दिला.

ममता कुलकर्णी म्हणाली, मला माझ्या 'राणा जी माफ करना' या गाण्यावर परफॉर्म करण्यास सांगत आहेत. पण ती ममता कुलकर्णी तर कधीच मेली आहे. ममतांच्या या वक्तव्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तिच्या या प्रतिक्रियेतून तिने आता ग्लॅमर आणि शोबिझच्या जगापासून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतल्याचं दिसून येत आहे. तिच्या या बदलाचं सोशल मीडियावर अनेकजण कौतुकही करत आहेत. ममता कुलकर्णी जवळपास २५ वर्षे भारताबाहेर होती. २०१६ मध्ये तिच्याविरोधात ड्रग्जशी संबंधित एक गुन्हा दाखल झाला होता. नंतर मुंबई उच्च न्यायालयाने हा खटला रद्द केला. त्यानंतर २०२४ मध्ये ममता साध्वीच्या रूपात भारतात परतली. भारतामध्ये परतल्यानंतर तिने सोशल मीडियावर एक भावुक पोस्टही शेअर केली होती. आपण २००० सालापासून भारताबाहेर होतो, असं तिने या पोस्टमध्ये सांगितलं होतं.

# गोविंदासोबतच्या अफेअरचा प्रश्नच नव्हता

बॉलिवूड अभिनेता गोविंदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. गोविंदाचे अनेक अभिनेत्रींसोबत अफेअर्स होते, असा दावा सुनीता यांनी केला होता. त्यानंतर गोविंदानेही पत्नीचे दावे फेटाळून लावले. या सगळ्या चर्चांदरम्यान गोविंदासोबत काम केलेल्या अभिनेत्री नीलम कोठारी यांच्या एका जुन्या नात्याबाबतच्या चर्चांनी पुन्हा जोर धरला आहे. एका मुलाखतीत नीलम यांनी गोविंदासोबतच्या अफेअरच्या चर्चांवर भाष्य केलं आहे. गोविंदा आणि नीलम कोठारी ही ८०च्या दशकातील लोकप्रिय जोडी होती. दोघांनी तब्बल १४ चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं असून, त्यापैकी अनेक चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरले. पडद्यावरची त्यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना चांगलीच पसंत पडली होती. त्यामुळे दोघे एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चाही त्यावेळी रंगल्या होत्या. आजही गोविंदा आणि नीलम यांच्या नात्याबाबतच्या चर्चा अधूनमधून समोर येतात. गोविंदासोबतच्या अफेअरच्या चर्चांवर बोलताना नीलम यांनी सांगितलं की, त्या काळात त्या खूप तरुण होत्या. त्यामुळे वैयक्तिक नात्यांपेक्षा त्यांचं संपूर्ण लक्ष करिअरवर होतं. नीलम म्हणाल्या, मी तेव्हा खूप तरुण होते. मला माहिती नव्हतं की त्यांचं लग्न झालं आहे. मला खूप उशिरा याबद्दल कळलं. नीलम यांनी त्यांच्या कुटुंबाबद्दलही या मुलाखतीत खुलासा केला. त्या म्हणाल्या की, त्यांचे पालक खूप कडक होते आणि त्यामुळे रिलेशनशिपमध्ये येण्याचा प्रश्नच नव्हता. मी खूप तरुण होते आणि माझे पालक खूप स्ट्रिक्ट होते. त्यामुळे माझ्यासाठी रिलेशनशिपमध्ये येणं हा पर्याय कधीच नव्हता. माझं संपूर्ण लक्ष माझ्या फिल्म्स आणि हिंदी शिकण्याकडे होतं. शूटिंगसाठी जातानाही कुटुंबातील कोणीतरी व्यक्ती नेहमी सोबत असायची. कारण माझ्या कुटुंबात सिनेसृष्टीबद्दल फार चांगलं मत नव्हतं, असं त्यांनी सांगितले होते.

# 'किंग'मध्ये राणीसोबत अभिषेकची जोडी?

बॉलीवूड अभिनेता शाहरुख खान सध्या त्याच्या 'किंग' चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याच्या या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. याचदरम्यान आता या चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली आहे. अभिनेत्री राणी मुखर्जीही या सिनेमाचा भाग असल्याची माहिती समोर आली आहे. राणी आणि अभिषेक बच्चनचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होतोय. यानंतर दोघे या चित्रपटानिमित्त एकत्र दिसणार असल्याची चर्चा होत आहे. व्हायरल फोटो हा राणी मुखर्जी आणि अभिषेक बच्चन यांच्या आगामी 'किंग'मधला असल्याची चर्चा आहे. काहींनी हा एआय फोटो असल्याचाही अंदाज लावला आहे.

'किंग'मध्ये अभिषेक आणि राणीचा एकत्र सीन असेल का यावर अद्याप अधिकृत माहिती आलेली नाही. राणी मुखर्जी आणि अभिषेक बच्चन ही जोडी 'बंटी और बबली'मुळे लोकप्रिय झाली. याशिवाय त्यांनी 'कभी अलविदा ना कहना','लागा चुनरी मे दाग','युवा' अशा काही सिनेमांमध्ये काम केले आहे. राणी मुखर्जी 'किंग'मध्ये अभिषेकच्या विरुद्ध भूमिकेत दिसेल. अभिषेक या चित्रपटात व्हिलनच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'किंग'च्या निमित्ताने हे दोन्ही कलाकार मोठ्या पडद्यावर तब्बल २० वर्षांनंतर एकत्र दिसणार आहेत. त्यांनी शेवटचे २००७ मध्ये आलेल्या 'लागा चुनरी में दाग' या चित्रपटात एकत्र काम केले होते. तसेच शाहरूख खानसोबत ती शेवटची २००६ च्या 'कभी अलविदा ना कहना' या चित्रपटात दिसली होती. मात्र, राणी मुखर्जीच्या या एंट्रीबाबत निर्मात्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. या बातम्या खर्या ठरल्या, तर चाहत्यांना दोन दशकांनंतर अभिषेक आणि राणीला रुपेरी पडद्यावर एकत्र पाहता येईल. राणीच्या भूमिकेबद्दलही गुप्तता पाळण्यात आली आहे. 'किंग'मध्ये शाहरूख खान मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटात त्याची मुलगी सुहाना खान देखील महत्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे. चित्रपटात अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, अभय वर्मा आणि दीपिका पदुकोण इत्यादी कलाकारही आहेत. याचे दिग्दर्शन 'पठाण' चित्रपटाचे दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांनी केले आहे. हा चित्रपट २४ डिसेंबर २०२६ रोजी जगभरात रिलीज होणार आहे.



# ‘हनुमान अंश’च्या सिक्केलमध्ये विराट अन् अनुष्का ?



आध्यात्मिक गुरू नीम करोली बाबा यांच्या जीवनावर आधारित ‘हनुमान अंश’ सिनेमा लवकरच २०० कोटींचा टप्पा गाठणार आहे. या सिनेमाने बॉक्स ऑफिस गाजवले असून लवकरच सिक्केलसुद्धा येणार असल्याचे निर्मात्यांनी जाहीर केले. ‘हनुमान अंश’ सिनेमाच्या पुढच्या भागामध्ये भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली व अभिनेत्री अनुष्का शर्मा यांच्या कॅमिओ भूमिका असण्याची शक्यता आहे. विराट कोहली, अनुष्का शर्मा आणि पलचे सह-संस्थापक स्टीव्ह जॉब्स यांसारखे अनेक सेलिब्रिटीसुद्धा ‘नीम करोली बाबा’ यांचे भक्त आहेत. ‘हनुमान अंश’च्या सिक्केलमध्ये या सेलिब्रिटींची आश्रमाला भेट आणि त्यांची श्रद्धा दाखवण्याची शक्यता आहे. याबाबत सिनेमाच्या सह-निर्मात्या नम्रता सिंग यांनी सिनेमाचे अजून दोन सिक्केल येणार असून तीन भागांमध्ये महाराजजींची गाथा मांडण्याची योजना असल्याचे सांगितले. तसेच यातील संभाव्य कॅमिओसाठी अनेक प्रमुख भारतीय आणि आंतरराष्ट्रीय व्यक्तींशी संपर्क साधला असल्याचे नम्रता सिंग यांनी सांगितले. हनुमान अंश ‘ट्रायलॉजी’ स्वरूपात असून यातील पहिल्या भागामध्ये त्यांचा सुरुवातीचा प्रवास, उत्तराखंडमधील कैंची धाम आणि नंतर पुढील आध्यात्मिक प्रवास दाखवण्यात येणार असल्याचे नम्रता सिंग यांनी सांगितले. पुढे त्या म्हणाल्या, हनुमान अंशच्या सिक्केलबाबत अजून लिहिण्यात आलेले नाही. आम्हाला थोडा ब्रेक घ्यावा लागेल, कारण मागील दीड वर्षांपासून आम्ही पूर्णवेळ काम करत असून ब्रेक घेतलेला नाही. सिनेमा रिलीज झाल्यानंतर वेळ मिळेल असे वाटले होते, पण अजूनही आम्हाला आराम मिळालेला नाही, त्यामुळे पुढील ९० दिवसांनंतर आम्ही पुन्हा एकदा काम सुरू करू. ‘हनुमान अंश’ ट्रायलॉजीचा तिसरा भाग आंतरराष्ट्रीय स्तरावर असणार आहे. नीम करोली बाबांनी आध्यात्मिक प्रसार करून भारताची ओळख जगभर कशी पोहोचवली, यावर आधारित तिसरा भाग असेल. यामध्ये परदेशी लोकांना, जसे की स्टीव्ह जॉब्स असोत, मार्क झुकरबर्ग, ट्विटरचे संस्थापक जॅक डॉर्सी किंवा ज्युलिया रॉबर्ट्स यांना कसे प्रभावित केले, याबद्दल सांगितले जाईल. यानंतर नम्रता सिंग यांनी ज्युलिया रॉबर्ट्स, विराट कोहली आणि अनुष्का यांसारख्या भक्त असलेल्या सेलिब्रिटींशी संपर्क साधला होता का असे विचारण्यात आले. यावर त्या म्हणाल्या, ‘हनुमान अंश’च्या सिक्केलमध्ये कॅमिओ साठी आम्ही काही सेलिब्रिटींशी संपर्क साधला. त्यांना सिनेमाबाबत सगळं माहीत आहे.





# सलमान साकारणार ‘कर्णा’ची भूमिका ?

ऐतिहासिक चित्रपटांचं आकर्षण मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीला देखील आहे. आपला गौरवशाली इतिहास, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचं चरित्र प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी आणि ते पाहण्यासाठी निर्माता, दिग्दर्शक आणि प्रेक्षकही उत्सुक असतो. असाच एक ऐतिहासिक चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात सूर्यपूत्र कर्णाचं चरित्र उलगडणार आहे. दरम्यान, नुकतीच या प्रोजेक्टबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. विशेष म्हणजे या चित्रपटासाठी बॉलिवूडचा भाईजान अर्थात सलमान खानची निवड करण्याची आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रोजेक्टची इंडस्ट्रीत चर्चा रंगली आहे.

अभिनेता सलमान खान सध्या त्याच्या 'मातृभूमी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. एकीकडे या प्रोजेक्टची चर्चा असताना सलमानला आणखी एक बिग बजेट सिनेमाची ऑफर मिळाल्याची अपडेट मिळते आहे. वृत्तानुसार, सलमान खान लवकरच दिग्दर्शक राकेश ओमप्रकाश मेहरा यांच्या आगामी चित्रपटात कर्णाची भूमिका साकारणार आहे. या मोठ्या प्रोजेक्टसाठी सलमानने काम करण्यास सुरुवात केली असल्याचंही बोललं जातंय. ही मिळालेल्या माहितीसार, या चित्रपटाचे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक राकेश ओमप्रकाश मेहरा करणार आहेत, तर फरहान अख्तरची एक्सेल एंटरटेनमेंट याची निर्मिती करेल. दरम्यान, याबाबत सलमान किंवा दिग्दर्शक राकेश ओमप्रकाश मेहरा यांनीही अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. तथापि, मेहरा यांनी यापूर्वी 'रंग दे बसंती', 'दिल्ली-६', 'भाग मिल्खा भाग' आणि 'तूफान' यांसारख्या चित्रपटांचे दिग्दर्शन केल्यामुळे, चाहते बऱ्याच काळापासून या प्रोजेक्टबद्दल उत्सुक आहेत. आता सलमान खानच्यामुळे हा चित्रपट आणखी चर्चेत आहे. सलमान खान मोठ्या पडद्यावर पहिल्यांदाच ऐतिहासिक भूमिकेत दिसणार आहे. त्यामुळे या प्रोजेक्टकडून चाहत्यांना खूप अपेक्षा आहेत.परंतु, चित्रपटाची कथा, सहाय्यक कलाकार किंवा निर्मितीबद्दल अद्याप कोणतीही माहिती उघड झालेली नाही. इतकेच नव्हे तर, राकेश ओमप्रकाश मेहरा यांच्या चित्रपटाच्या शीर्षकाबद्दल देखील कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

# आर. माधवनला लग्न लपवण्याचा दिला होता सल्ला

आर. माधवनने फक्त दाक्षिणात्य सिनेमांत काम केले नाही तर बॉलीवूडमध्येही त्याने वेगळी ओळख निर्माण केली. विशेष म्हणजे, सिनेसृष्टीत पदार्पण करण्याआधी त्याने टेलिव्हिजनवर काम केले होते. तसेच, त्याचे लग्नही झाले होते, तो तमिळही होता, या सगळ्या कारणांमुळे त्याला सिनेसृष्टीत ओळख मिळणार नाही, असे म्हणले जात होते. आर. माधवनने नुकतीच इंडियन स्कूल ऑफ बिझनेस येथे झालेल्या एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी तो म्हणाला की इंडस्ट्रीतील ठरावीक नियमांनुसारच निर्णय घ्यावेत, असे मला कधीच वाटले नाही. चित्रपटांत काम करण्यापूर्वी आर. माधवनने 'घर जमाई', 'सी हॉक्स' यांसारख्या मालिकांत काम केले होते. तो टीव्हीवर जवळजवळ १८०० भागांमध्ये दिसला होता. तो मोठ्या प्रमाणात टीव्हीवर दिसल्यामुळे सिनेसृष्टीत त्याचा तोटा होईल असे त्याला सांगितले जात होते. तो म्हणाला, मी फिल्म इंडस्ट्रीत आलो, तेव्हा टीव्हीवर जवळपास १,८०० भागात काम केले होते. टीव्ही इंडस्ट्रीतील प्रत्येकजण मला म्हणायचा की तू टीव्हीवर मोठ्या प्रमाणात लोकांना दिसला आहेस. तुला सिनेमांत यश मिळणार नाही. खरं तर मी मुंबईत अभिनेता होण्यासाठी आलोच नव्हतो. मी कधी अभिनयाचं प्रशिक्षणही घेतलं नाही. हे सगळं आपोआप घडत गेलं आणि मालिकांच्या १,८०० भागांत काम केले. पण, त्यानंतर मणि रत्नम यांच्याकडून मला फोन आला आणि अलैपायुथे या तमिळ सिनेमात काम केले. पुढे अभिनेता म्हणाला, मी जेव्हा तमिळ सिनेमात काम केलं, तेव्हा मला सांगण्यात आलं की तुला तमिळ इंडस्ट्रीमध्ये स्वीकारलं जाणार नाही. कारण तुझा रंग गोरा आहे, तू उत्तर भारतीयांसारखा दिसतोस. तुला रोमँटिक हिरो म्हणूनही स्वीकारलं जाणार नाही, कारण तुझं लग्न झालं आहे. प्रेक्षकांना लग्न झालेले रोमँटिक हिरो आवडत नाहीत. तो असेही म्हणाला, जेव्हा सिनेमाचे प्रमोशन सुरू होते. त्यावेळी पब्लिसिटी टीमने मला सांगितले की जेव्हा तू पत्रकार परिषदेत जाशील, तेव्हा तुझ्या लग्नाबद्दल बोलू नकोस. आम्हाला माहीत आहे की तू सिनेमा प्रदर्शित होण्याच्या सहा महिने आधी लग्न केले आहेस. मीडियासमोर तुझ्या लग्नाबद्दल बोलून नकोस, त्यामुळे सिनेमा फ्लॉप होईल. मला ते आवडलं नाही. मी मणि रत्नम सरांकडे गेलो आणि त्यांना म्हणालो की ते मला खोटं मला बोलायला सांगत आहेत. ते मला म्हणाले की तुला वाटतं ते तू कर. पत्रकार परिषदेत मला लग्नाबद्दलचाच पहिला प्रश्न विचारला. त्यावेळी मी त्यांना खोटं बोललो नाही. मी त्यांना लग्न झाल्याचे सांगितले. मी इथे रोमँटिक हिरो बनण्यासाठी आलो नाही. माझे लग्न झाले नाही, असे मी म्हणालो तर तो माझ्या पत्नीचा अपमान असेल. ती मुलाखत व्हायरल झाली. लोकांनी मला स्वीकारले. आर. माधवन असेही म्हणाला, जेव्हा मी तमिळ सिनेमांत काम केले, तिथे ओळख निर्माण केली. त्यावेळी मला लोक म्हणू लागले की तू आता तमिळ हिरो आहेस. आता हिंदी सिनेमात तू काम करू शकणार नाहीस. त्यानंतर मी रहना है तेरे दिल में, ३ इडियट्स, गुरू अशा सिनेमांत काम केले. त्यामुळे लोकांनी असे जे समज निर्माण करून ठेवले होते, ते सगळे चुकीचे ठरले. दरम्यान, रेहना है तेरे दिल में या चित्रपटातून आर. माधवनने हिंदी सिनेमात पदार्पण केले.



# रश्मिकाच्या हाती लागला मोठा प्रोजेक्ट!

साउथचा रश्मिका मंदाना तिच्या करिअरमधील सर्वात आव्हानात्मक भूमिका साकारण्यासाठी सज्ज झाली आहे. अभिनेत्री महान गायिका एम.एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका साकारणार आहे. चेन्नईमध्ये या बहुप्रतिक्षित सिनेमाची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे. या सिनेमाची माहिती देताना निर्मात्यांनी सोशल मीडियावर अनाउन्समेंट पोस्टर शेअर केलं आहे. 'एम एस- ए लिगसी ऑन स्क्रीन' असं या सिनेमाचं नाव असून, भारतरत्न एम.एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त या सिनेमाचा भव्य शुभारंभ करण्यात येणार आहे. या सिनेमाच्या लॉन्च इव्हेंटला अभिनेते कमल हसन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. 'जर्सी'सारख्या सिनेमांसाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक गौतम तिन्ननुरी या बायोपिकचं दिग्दर्शन करणार आहेत. तर संगीताची जबाबदारी अनिरुद्ध रविचंदर सांभाळणार आहे. अल्लू अरविंद, बन्नी वासू आणि रॉकलाइन वेंकटेश हे या सिनेमाची निर्मिती एकत्रितपणे करणार आहेत. या सिनेमाचा लॉन्च इव्हेंट चेन्नईतील एका संगीत अकादमीत आयोजित करण्यात येणार आहे. एम.एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या ११० व्या जयंतीचं औचित्य साधून हा कार्यक्रम होणार आहे. रश्मिकानेही या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी तयारी सुरू केल्याची माहिती आहे. एम.एस. सुब्बुलक्ष्मी या भारतातील सर्वाधिक मानाच्या संगीत कलाकारांपैकी एक होत्या. कर्नाटक संगीतात त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठं नाव कमावलं. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मिळवणार्या त्या पहिल्या संगीत कलाकार होत्या. दरम्यान, या बायोपिकसोबतच रश्मिका मंदाना 'मैसा' या ॲक्शन थ्रिलर सिनेमातही दिसणार आहे. रवींद्र पुल्ले दिग्दर्शित या सिनेमात ती आदिवासी गोंड महिलेची भूमिका साकारणार आहे. हा सिनेमा २७ नोव्हेंबरला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. याशिवाय रश्मिका आणि विजय लग्नानंतर पहिल्यांदाच पॅन इंडिया फिल्म 'राणाबली' मध्ये एकत्र दिसणार असल्याचं सांगितलं जात आहे. हा सिनेमा १६ ऑक्टोबरला सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.




# 'स्लमडॉग: ३३ टेम्पल रोड'चा टीझर आऊट

साउथचा आपल्या अप्रतिम अभिनयासाठी जगभरात ओळखला जाणारा दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपती पुन्हा एकदा एका अत्यंत आव्हानात्मक आणि हटके भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी 'स्लमडॉग: ३३ टेम्पल रोड' या पॅन- इंडिया चित्रपटाचा धमाकेदार टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझरमध्ये अभिनेता विजय सेतुपती एका अंध भिकाऱ्याच्या अत्यंत आव्हानात्मक भूमिकेत दिसत आहे. त्याने अंध व्यक्तीचे हावभाव अतिशय प्रभावीपणे साकारले आहेत. कन्नड सुपरस्टार 'दुनिया विजय' हा या चित्रपटात मुख्य खलनायकाच्या भूमिकेत असल्याचं दिसतंय. तर बॉलिवूड अभिनेत्री तब्बू या चित्रपटात एका कडक पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत एन्ट्री करताना दिसते. टीझर पाहिल्यावर प्रेक्षकांसमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहतोय की विजय सेतुपतीचे पात्र खरोखरच अंध आहे, की यामागे त्याचे काही मोठे रहस्य लपलेले आहे. 'पोखिरी' आणि 'बिझनेसमन' सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे प्रसिद्ध दिग्दर्शक पुरी जगन्नाथ यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'स्लमडॉग: ३३ टेम्पल रोड' हा चित्रपट संपूर्ण भारतात तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदी अशा ५ भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. निर्मात्यांनी अद्याप चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर केली नसली, तरी टीझर रिलीज झाल्यामुळे प्रेक्षकांमधील उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.





# 'मॅगझिन' सिनेमाचा फर्स्ट लूक चर्चेत

Gen Z पिढी जगभर फिरते, स्वतःची ओळख घडवते, नव्या शक्यता शोधते, पण या सगळ्या प्रवासात ही आजची पिढी नेहमीच एक विचार करते..तो म्हणजे आपलं खरं घर नेमकं कुठे आहे? याच आशयावर आधारित आगामी मराठी चित्रपट 'मॅगझिन' येत्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. Gen Z च्या बदलत्या विश्वाची झलक दाखवणाऱ्या या चित्रपटाचं पहिलं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. वेगळं आणि उत्सुकता निर्माण करणारं शीर्षक, त्याला साजेसं दृश्यविश्व आणि तरुणाईशी थेट संवाद साधणारी मांडणी यामुळे 'मॅगझिन'ने प्रदर्शनापूर्वीच लक्ष वेधून घेतलं आहे. 'मॅगझिन' ही केवळ Gen Z ची गोष्ट नाही; तर Gen Z पिढीला समजून घेण्याचा आणि तिच्या माध्यमातून जुन्या- नव्या पिढ्यांमधला संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. आजची तरुण पिढी आपल्या करिअरच्या, नात्यांच्या आणि आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटा निवडत असताना 'घर', 'आपली माणसं' आणि 'आपली मुळं' यांच्याशी तिचं नातं नेमकं कसं बदलतं, याचा भावनिक वेध चित्रपटातून घेतला जाणार आहे. चित्रपटाच्या कथेचे अनेक पैलू निर्मात्यांनी अद्याप गुलदस्त्यात ठेवले आहेत. मात्र, पोस्टरमधून हा प्रवास केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा नसून स्वतःचा शोध घेण्याचा आणि आपल्या मुळांकडे पुन्हा पाहण्याचा प्रवास असल्याचं जाणवतं.

'मॅगझिन'चे दिग्दर्शन शुभम संजय शेवडे यांनी केलं आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यात दडलेल्या असामान्य अनुभवांचा वेध घेण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. चित्रपटात नवे चेहरे आणि अनुभवी कलाकार एकत्र आले आहेत. त्यामुळे पडद्यावर केवळ दोन वेगवेगळ्या पिढ्यांची उपस्थिती नाही, तर त्यांच्या विचारांचा, अनुभवांचा आणि जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा संवादही पाहायला मिळणार आहे. याबद्दल दिग्दर्शक शुभम संजय शेवडे म्हणाले, 'मॅगझिन'च्या माध्यमातून आम्हाला एका प्रवासाची दोन टोकं एकत्र आणायची होती. पहिल्यांदा पाऊल ठेवणारे नवे आवाज आणि अनेक वर्षांचा अनुभव आपल्या अभिनयातून मांडणारे अनुभवी कलाकार. या भेटीतच चित्रपटाची मोठी आशा दडलेली आहे. प्रत्येक पिढी आपल्या मागे काहीतरी ठेवून जाते आणि प्रत्येक नवी पिढी ते आपल्या पद्धतीने पुढे घेऊन जाते. Gen Z च्या प्रश्नांना, त्यांच्या भावविश्वाला आणि 'घराकडे परतण्याच्या' बदलत्या अर्थाला मराठी सिनेमाच्या माध्यमातून मांडणारा 'मॅगझिन' यंदाच्या दिवाळीत एक वेगळा अनुभव देण्यास सज्ज झाला आहे. हा 'मॅगझिन' सिनेमा २३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होईल.

# 'काकुळ'चा खतरनाक ट्रेलर रिलीज

आजची रहस्य, भय आणि सामाजिक सूडभावना यांची अनोखी सांगड घालणाऱ्या आगामी मराठी चित्रपट 'काकुळ'चा थरारक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटात अभिनेत्री मोनालिसा बागल मुख्य भूमिकेत झळकणार असून, तिची भूमिका यावेळी नेमकी कशी असणार, याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली आहे. मोनालिसा बागलने यापूर्वीही काही मराठी चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, 'काकुळ'मधून ती एका वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांसह मराठी सिनेरसिकांचेही या चित्रपटाकडे लक्ष लागले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सूरज रघुनाथ पडवळ यांनी केले आहे. मोनालिसा बागलसोबत अक्षय टंकसाळे, संजय खापरे, यश डिंबळे, भूषण मंजुळे, आरती शिंदे, विवेक यादव आणि प्रकाश धिंडले हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. 'काकुळ'ची कथा संग्राम या गावातील श्रीमंत आणि राजकीय वारसा लाभलेल्या तरुणाभोवती फिरते. संग्रामच्या आयुष्यात कल्पना नावाच्या तरुणीचा प्रवेश होतो आणि त्यानंतर त्याच्या आयुष्यात एकापाठोपाठ एक धक्कादायक घटना घडू लागतात. या घटनांमागे नेमकं कोणतं रहस्य दडलं आहे? कल्पना आणि संग्राम यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा एकमेकांशी काय संबंध आहे? या प्रश्नांची उत्तरं चित्रपट पाहिल्यानंतरच मिळणार आहेत. 'काकुळ'च्या माध्यमातून मराठी रहस्यपट आणि भयपटांच्या पारंपरिक चौकटीपेक्षा काहीतरी वेगळं मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रहस्य आणि थरारासोबतच सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारा अनुभव प्रेक्षकांना या चित्रपटातून मिळण्याची शक्यता आहे. ट्रेलरमुळे कथेत दडलेलं रहस्य अधिकच गडद झालं असून, संग्राम आणि कल्पनाच्या आयुष्यात पुढे नेमकं काय घडणार, याची उत्सुकता वाढली आहे. या रहस्याचा उलगडा करण्यासाठी प्रेक्षकांना नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.




# केदार शिंदेंचा गणा धाव रे! लवकरच भेटीला

मराठी सिनेविश्वातील प्रसिद्ध दिग्दर्शक केदार शिंदेंनी काही दिवसांपूर्वीच 'गणा धाव रे!' या त्यांच्या नव्या सिनेमाची घोषणा केली होती. कोकणातील पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या 'गणा धाव रे' चित्रपटात प्रेक्षकांना दंतकथा, भक्ती आणि माणुसकी यांच्या भावविश्वात गुंफलेली कथा पाहायला मिळणार आहे. आता गणेशोत्सवाच्या निमित्ताने केदार शिंदेंनी खास पोस्ट शेअर करत या सिनेमाची रिलीज डेट आणि कलाकारांची नावं जाहीर केली आहेत. शिंदे लिहितात, गणपती बाप्पा मोरया! काही गोष्टी आपण स्वतःहून करतोय, असा आपलाच गैरसमज असतो!

खरंतर हा परमेश्वराने लिहून ठेवलेला असतो. आपण फक्त त्या बरहूकूम आपला Performanbe देत असतो. या सिनेमाच्या निमित्ताने हेच घडलं. हा गणपती बाप्पाचा प्रसाद अचानकच हाती पडला. मी माझ्या आगामी सिनेमाच्या तयारीत असताना, हा सिनेमा चालून आला. Blive Produbtion तर्फे हा प्रस्ताव आला होता.. आज त्याची प्रदर्शनाची तारीख जाहीर होतेय. ती सुद्धा गणपती उत्सवाच्या काळात!! हा सुद्धा गणपती बाप्पाचा प्रसाद!! प्रयत्न आहे.. आवडेल याची खात्री आहे. कारण साक्षात देव भक्ताच्या हाकेला धावून येणार आहे.

गणा धाव रे! 'गणा धाव रे!' हा सिनेमा २७ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. यामध्ये भरत जाधव, प्रणाली घोगरे, भार्गवी चिरमुले, सुलभा आर्या, काजल काटे या कलाकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिका असतील. अभिनेत्री प्रणाली घोगरे या सिनेमात पहिल्यांदाच मुख्य भूमिका साकारणार आहे.

दरम्यान, मनोरंजन विश्वातील कलाकारांनी केदार शिंदेंना या नव्या सिनेमासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.





# श्रिया आता 'हैवान'मध्ये दिसणार

अभिनेत्री श्रिया पिळगांवकर नुकतीच 'मिर्झापूर' सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. श्रियाने या सिनेमात स्वीटी गुप्ता ही भूमिका साकारली आहे. या सिनेमाचे सगळीकडे कौतुक होत आहे. या सगळ्यात श्रियाचे वडील म्हणजेच अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी लेकीसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. सचिन पिळगांवकर यांनी काही फोटो शेअर केले आहेत. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. सचिन पिळगांवकर यांनी श्रियासाठी लिहिले, खरं तर स्वीटी आमचं प्रेम आहे. चीयू तुला मोठ्या स्क्रीनवर पाहताना खूप आनंद झाला. तुझे दोन्ही सिनेमे थिएटरमध्ये प्रेक्षकांना पाहता येणार आहेत आणि त्यासाठी मला तुझा अभिमान वाटतो. पुढे त्यांनी लिहिले, मिर्झापूर सिनेमाला प्रेक्षकांचा ज्या पद्धतीने प्रतिसाद मिळत आहे, त्यासाठी संपूर्ण टीमचे खूप अभिनंदन! आता 'हैवान' थिएटरमध्ये प्रदर्शित होण्याची वाट पाहत आहे. शेवटी त्यांनी श्रियाला उद्देशून लिहिले, मेहनत कर आणि अशीच नेहमी आनंदी, हसतमुख राहा. तुझ्या चेहऱ्यावरचं हे हसू असंच कायम राहू दे, असे लिहीत सचिन पिळगांवकर यांनी श्रियाचे कौतुक केले, तिला शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले. शेवटी त्यांनी श्रियाला टॅगही केले आहे. सचिन पिळगांवकरांनी ही पोस्ट शेअर करताना काही खास फोटोही पोस्ट केले आहेत. मिर्झापूर व हैवान या दोन्ही सिनेमांतील काही सीनचे फोटो त्यांनी शेअर केले आहेत. तसेच, दोन्ही सिनेमांची पोस्टर्स शेअर केली आहेत. तसेच, कुटुंबाबरोबरचा फोटोही शेअर केला आहे. एका व्हिडीओमध्ये ते सुप्रिया पिळगांवकर यांच्याबरोबर सिनेमा पाहत असल्याचे दिसत आहे. तसेच, दोन्ही सिनेमांतील गाण्यांचेही व्हिडीओ पाहायला मिळत आहेत. सचिन पिळगांवकर यांच्या पोस्टवर श्रियाने लव्ह यू, असे लिहीत प्रेम व्यक्त केले आहे. त्याबरोबरच अनेक कलाकार आणि चाहत्यांनीदेखील श्रियाचे कौतुक केले आहे.



# 'कॉकटेल' सिनेमा करणं माझी चूक होती



'बिग सैफ अली खान सध्या 'हैवान' सिनेमामुळे चर्चेत आहे. अनेक वर्षांनी तो आणि अक्षय कुमार एकाच सिनेमात दिसणार आहेत. आज सिनेमा रिलीज झाला असून प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळत आहे. सैफने त्याच्या करिअरमध्ये अनेक हिट सिनेमे दिले. त्यातलाच एक'कॉकटेल'. यामध्ये त्याची डायना पेंटी आणि दीपिका पादुकोणसोबत केमिस्ट्री दिसली. मात्र हा सिनेमा करणं ही चूक होती असं नुकतंच सैफ म्हणाला. एका मुलाखतीत सैफ अली खान म्हणाला, कॉकटेलमधील गौतमची भूमिका माझ्यासाठी योग्य नव्हती. मी सिनेमाचा निर्माता असल्याकारणाने मी त्यात काम केलं. त्यामुळे ती चूक टाळली जाऊ शकत नव्हती. कॉकटेलमध्ये काम करणं ही १०० टक्के माझी चूकच होती आणि सिनेमाची स्क्रिप्टही खूप निकृष्ट दर्जाची होती. तसंच बघायला गेलं तर सिनेमाची स्क्रिप्ट अगदीच हलकी फुलकी आणि मजेशीर होती. तो पुढे म्हणाला, मी त्या भूमिकेसाठी आधी होकार दिलाच नव्हता. पण सिनेमा बनावा म्हणून मला काम करावं लागलं. आपण अनेकदा वेगवेगळ्या कारणांमुळे गोष्टी करत असतो. मला वाटतं वेरोनिकाची भूमिका खूप इंटरेस्टिंग होती. सैफने 'हमशकल्स' सिनेमावरही भाष्य केलं. तो म्हणाला, मला वाटतं हमशकल्स मध्ये माझं कास्टिंग चुकीचं होतं. काही अभिनेते असे आहेत ज्यांनी खरोखर त्यात चांगलं काम केलं असतं. यासाठी विशेष प्रकारची कमिटमेंट आणि लोकांना थोड्या वेगळ्या लेवलवर हसवण्याची क्षमता गरजेची होती. कदाचित मी स्वत:ला तितकं तयार करु शकलो नाही. मी त्यात तितका चांगला दिसलो नाही. साजिदला बहुतेक वाटलं की मी अक्षयसारखंच काम करेन. पण ती चूक होती. तरी मी सिनेमासोबत उभा आहे, साजिदच्या बाजून उभा आहे आणि आपण सगळ्यांनी आपापल्या सिनेमांसाठी उभं राहिलं पाहिजे.

# शेराच्या लेकाची अभिनयात एन्ट्री!

बॉलिवूडचा दबंग अभिनेता सलमान खानचा स्वॅगच वेगळा आहे. भाईजान नेहमी कडेकोट सुरक्षेत दिसतो. याचं पूर्ण क्रेडिट जातं ते त्याचा बॉडिगार्ड शेराला. गेल्या कित्येक वर्षांपासून तो सलमान खानचा बॉडीगार्ड म्हणून काम करतो आहे. गर्दीच्या ठिकाणी सलमानच्या बाजूला शेरा असतो तेव्हा अभिनेत्याला सुरक्षेची चिंताच करावी लागत नाही. आता शेराचा मुलगा अबीर सिंग चर्चेत आला आहे. अबीर लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे.

वृत्तानुसार, शेराचा मुलगा अबीर सिंग 'टार्झन' नावाच्या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेता सूरज पांचोली देखील मुख्य भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे. अबीरच्या बॉलिवूड पदार्पणाच्या चर्चा २०२२ पासूनच सुरू होत्या. त्यावेळी सलमान खान स्वतः या चित्रपटाची निर्मिती करणार होता. तसेच याबाबत दिवंगत अभिनेते- दिग्दर्शक सतीश कौशिक यांच्याशी चर्चा झाली होती. मात्र, सतीश कौशिक यांच्या निधनानंतर चित्रपटाची अधिकृत घोषणा होऊ शकली नव्हती. आता पुन्हा एकदा या चित्रपटाच्या कामाला गती मिळाल्याचे म्हटले जात आहे.

अबीरसोबत दिसणारा सूरज पांचोली आणि सलमान खान यांचे नाते खूप खास आहे. २०१५ मध्ये सलमान खाननेच निर्मिती केलेल्या 'हिरो' चित्रपटातून सूरजने आथिया शेट्टीसोबत पदार्पण केले होते. आता अबीर सिंगच्या पहिल्या चित्रपटातही सूरजची महत्त्वाची भूमिका असणार आहे.



**अनेक वर्षांनंतर डिसेंबर २०२३ ला पुण्यातील एका कार्यक्रमात राजदत्त यांना भेटलो. त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी मला जवळ जवळ ओढूनच पुढ्यात घेतले. वृद्ध नेत्रात माझ्याबद्दलचे वात्सल्य दिसले. थोड्या गोष्टी झाल्यावर लगेच म्हणाले, तू मागे उल्लेख केलेला 'मधुचंद्र' मधील प्रसंग पटकन सांग. मला आजच्या कार्यक्रमात तो सांगायचा आहे. हल्ली विसरायला होते. मी धन्य झालो. दिग्दर्शन चातुर्याचा उत्कृष्ट प्रसंग.**

# चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन: कलामहर्षी राजदत्त

अनेक वर्षांनंतर डिसेंबर २०२३ ला पुण्यातील कार्यक्रमात राजदत्त यांना भेटलो. त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी मला जवळ जवळ ओढूनच पुढ्यात घेतले. वृद्ध नेत्रात माझ्याबद्दलचे वात्सल्य दिसले. थोड्या गोष्टी झाल्यावर लगेच म्हणाले, तू मागे उल्लेख केलेला 'मधुचंद्र' मधील प्रसंग पटकन सांग. मला आजच्या कार्यक्रमात तो सांगायचा आहे. हल्ली विसरायला होते. मी धन्य झालो. दिग्दर्शन चातुर्याचा उत्कृष्ट प्रसंग-

'मधुचंद्र'चे नायक दिनू खरे (डॉ. काशिनाथ घाणेकर) नैराश्येच्या गर्तेत जीव देण्यासाठी डोंगर कड्यावर जातात व झोकून देताना विचार करीत असता पाठीवर थाप पडते. वळून पाहता ५-२५ असे समदु:खी लाईनीत उभे दिसतात व घाई करीत असतात. संवादफेकीतून व मूकाभिनयातून परिस्थितीचा उपहास विहंगम पद्धतीने व्यक्त होतो व प्रसंग थोडा विनोदी होतो. गंभीर विषयदेखील उपरोधिक व हास्यकारक दिग्दर्शित करण्याची राजदत्त यांची हातोटी होती.

**'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना। शब्दरूप आले मुक्या भावनांना'** (धाकटी बहीण १९७०)- गाण्यातील प्रसंग दिग्दर्शित करताना दत्ताजींची (राजदत्त) नजर नायक- नायिकेच्या शब्दानुरूप अभिनयाकडे असायची. 'मुक्या भावनांना' शब्दात प्रकट करतानाचा अभिनय तसेच भावनांना वाट दिल्यावर 'उगा लाजण्याचा किती हा बहाना' हा समर्पक अंतरा यथोचित सादर करून घेतला. 'युगाचे मिळावे रूप या क्षणांना' प्रेमसुखातील कृतकृत्यता मालूम दर्शवून अनोखा अर्थ प्राप्त झाला.

**'एकाच या जन्मी जणू फिरुनी पुन्हा जन्मेन मी'** (पुढचं पाऊल १९८६)- एखादे गीत अनेक वर्षे मनात गुंजी घालत असते. कारण दिग्दर्शकाने भावपूर्ण सजवले असते. 'लहरेन मी, बहरेन मी। शिशिरातुनी उगवेन मी' नायिकेच्या मनात नूतन आशा पल्लवित करून जीवनात ऊर्मी निर्माण करण्याचा आशय प्रदर्शित केला. 'संसार हा सुखाचा । मी अमृतात न्हाते' (घरची राणी १९६८)- भालजी पेंढारकर यांचा चित्रपट दिग्दर्शित केला, यातच सर्व काही आले.

दत्ताजी भालजींच्या कसोटीस उतरले. संसारातील सौख्यात तृप्त होणारी स्त्री अमृतात न्हाल्यागत आनंद प्रकट करते. 'तू देवरूप माझे । मी एकरूप झाले...' पतीबद्दल निस्सीम विश्वास व प्रेम; आता काय ? 'माझ्या मनात कोणी अंगाई गीत गाते...' मातृत्व सुखाची गोड चाहूल लागल्यामुळे कोमल भावनांच्या अनुभूतीत



एकरूप होऊन जाते. गीतातील प्रसंग दिग्दर्शित करताना दत्ताजी रंगून जात. कलाकाराच्या चेहऱ्यावरील बारीक रेषामधील भावही ते टिपत असत. शब्दार्थ जिवंत करूनच ते थांबत असत.

**'तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं...?** (शापित १९८२)- दैनंदिन कामकाज करताना शेतकरी जोडपे आयुष्यातील अपेक्षित सुखावर कल्पना करताना हे वास्तववादी गाणे चपखल दिग्दर्शनाचा नमुना ठरले.' अवकळा समदी निघून जाईल। बीज तुझ्या माझ्या कुशीतुनी...' कितीही श्रमाने शरीर झिजले तरी कूस उजवल्यावर संसारातील आनंदाला पारावार राहत नाही. मशागती करून पीक हाती येतानाचा मथितार्थ. कुसेतील अर्भकाच्या संगोपनाची सहजपणे जाणीव करून देताना गीतकार व दिग्दर्शकाच्या चतुर कलाकारीने मन मोहरते. उत्कृष्ट चित्रपटाचे रजतकमळ प्राप्त हा चित्रपट आहे.

**'चिंब पावसानं रानं झालं आबादानी। झाकू कशी पाठीवरली चांदन गोंदणी'** (सर्जा १९८७)- सळसळत्या तारुण्याचा बहर नशिल्या निसर्गाच्या सान्निध्यात ना. धों. महानोर यांच्या शब्दावर जणू ओसंडून वाहतो. 'झाकू नको कमळण बाई। एकांताच्या कोणी। रुपखणी अंगावरली सखे। लावण्याच्या खाणी।।' राजदत्त यांनी अत्यंत खुबीने कवीच्या काव्यातील श्लेषाला समर्पकपणे आपले चातुर्य पणास लावून चित्रित केले. 'अंगावरी थरथर फुलली। झिम्मड भिजल्यावाणी...' परस्पर जवळीकतेने अंग थरथराया लागले, जणू ओलेत्या अंगाची थरथर. उत्कृष्ट चित्रपटासाठी रजतकमळ याही चित्रपटास मिळाले.

**'चिंधी बांधते द्रौपदी हरीच्या बोटाला'** (झेप १९७१)- वैजयंतीमाला बाली यांच्या एकमेव मराठी चित्रपटाचे दिग्दर्शन राजदत्त यांनी केले. डॉ. बाली यांच्या कथानकाला यथार्थपणे उत्कृष्ट दिग्दर्शनाच्या मुशीत बसविले.

**'टाळ बोले चिपळीला, नाच माझ्या संग'** (भोळीभाबडी १९७३)- खलस्वरूपी नायकाचे पात्रही दर्शकाच्या पसंतीस उतरवताना दत्ताजी यशस्वी झाले. पं. भीमसेन जोशी यांचे वरील गाणे चित्रपटाची जमेची बाजू ठरली. मोहमायेच्या चंदेरी दुनियेत वावरूनही सर्वार्थाने नि:संग राहणारे, 'चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन' या व्रताचे आचरण करणारे कलातपस्वी राजदत्त खऱ्या अर्थी महाराष्ट्राचे भूषण आहेत.

१९७४ सालच्या हिंगोली येथील वास्तव्यात त्यांची माझी पहिली भेट झाली. सिनेदिग्दर्शन विषयावरील चर्चा झाल्यावर ते म्हणाले, तुला चित्रपटातले एवढे बारकावे माहीत आहेत. तू सिनेमात ये! मी धन्य झालो. एकदा नागपूरच्या भेटीत ते दत्ताच्या पारण्याच्या दिवशी रात्री ८ वाजता माझ्याकडे जेवण्यास आले. गप्पांच्या ओघात म्हणाले, तू इतके सिनेमावर लिहितोस, एक पुस्तक काढ. मी करीन विमोचन ! माझे पहिले पुस्तक 'रजत रंजनी' मी त्यांना समर्पित केले. २०१७ साली त्यांच्या हस्ते विमोचनही झाले. मी कृतार्थ झालो.

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव येथे २१ जानेवारी १९३२ रोजी दत्तात्रेय अंबादास मायाळू यांचा जन्म झाला. वर्धा येथील वाणिज्य महाविद्यालयातून स्नातक झाले. मद्रास येथे 'चांदोबा' मासिकात नोकरी केली. तिथे राजाभाऊ परांजपे यांच्याशी ओळख झाली. १९६० मध्ये राजाभाऊंचे सहायक दिग्दर्शक झाले. त्यांच्यासोबत आठ चित्रपटात सहायक म्हणून काम केल्यावर १९६७ साली 'मधुचंद्र' चे स्वतंत्र दिग्दर्शन केले. त्यांनी राजदत्त नाव धारण केले.

जवळपास २८ चित्रपट दिग्दर्शित केले. त्याचप्रमाणे दूरदर्शनच्या जवळपास १० मालिकांचे पण दिग्दर्शन केले. त्यांना मिळालेले पुरस्कार- राष्ट्रीय पुरस्कार ३ वेळा, फिल्म फेअर मराठी ३ वेळा, महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार (दिग्दर्शक) १२ वेळा. झी गौरव पुरस्कार व भारत सरकारतर्फे 'पद्मभूषण' पुरस्कार. चित्रपट हे जनसंवाद व प्रबोधनाचे माध्यम असून त्याद्वारे अनेक संदेश देणारे राजदत्त हे या क्षेत्रात कमालीचे यशस्वी झाले. वयाच्या ९४ व्या वर्षी कृतार्थ जीवन जगत आहे. 'अष्टविनायका तुझा महिमा कसा...'

**रमेश पोफळी**

# डेटिंगच्या चर्चांवर अमिषा पटेलने मौन सोडलं



बॉलिवूड अभिनेत्री अमिषा पटेल गेल्या काही दिवसांपासून क्रिकेटपटू हार्दिक पांड्यासोबतच्या कथित नात्यामुळे चर्चेत आहे. 'कहो ना प्यार है' आणि 'गदर'सारख्या गाजलेल्या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या अमिषाचा हार्दिकसोबतचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर दोघेही एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. अखेर अमिषाने या चर्चांवर प्रतिक्रिया देत अफवांवर जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

अमिषा पटेल आणि हार्दिक पांड्या मुंबईतील ताजमहाल पॅलेसमध्ये एकत्र दिसले होते. यावेळी दोघे गप्पा मारताना दिसत असून, अमिषा हार्दिकची आपल्या मित्रांशी ओळख करून देताना दिसली. याचदरम्यान तिने हार्दिकच्या खांद्यावर हात ठेवल्याचं व्हिडिओमध्ये दिसतं. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्यांच्या नात्याबाबत विविध चर्चा सुरू झाल्या. व्हायरल झालेल्या या व्हिडिओवर अनेक नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या. एका युझरने तर अमिषा आणि हार्दिक यांच्यातील संभाषण आणि त्यांचं वागणं केवळ मैत्रीपुरतं मर्यादित नसल्याचं सूचित केलं. त्याने व्हिडिओ शेअर करत दोघांच्या कथित नात्याबाबत भाष्य केलं. अमिषाने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर या पोस्टचा स्क्रीनशॉट शेअर करत संबंधित युझरला सणसणीत टोला लगावला. अमिषाने उपरोधिक शैलीत म्हटलं की, तुमचं अगदी बरोबर आहे. अरे देवा, तुमचं बरोबर आहे खरंच, ज्या प्रकारे मी त्याच्यावर हात ठेवला होता, ते खूप रोमँटिक होतं. पुढे तिने त्या युझरला म्हटलं की, मी तुम्हाला ओळखत नाही, पण तुमच्या नक्कीच एकही मैत्रीण नाही. अशा गोष्टींबद्दल पोस्ट करण्यापूर्वी तुम्ही एक मैत्रीण बनवायला हवी. दरम्यान, अमिषाचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये पापाराझींनी तिला हार्दिक पांड्यासोबतच्या व्हायरल व्हिडिओबाबत प्रश्न विचारला. तुमच्या आणि हार्दिकच्या व्हायरल व्हिडिओबद्दल तुम्हाला काय म्हणायचं आहे? असा सवाल तिला करण्यात आला. यावर अमिषाने मिश्कीलपणे उत्तर दिलं, ते इतकं व्हायरल झालंय की आता ते संपलंय. यानंतर ती घाईघाईने तिथून निघून गेली. अमिषा पटेल २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गदर २'मध्ये दिसली होती. आता अमिषाने 'गदर ३'बाबतही संकेत दिल्याने तिच्या चाहत्यांमध्ये या चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे.



# राजकारणात जाण्याचा विचार नाही

बॉलिवूड अभिनेत्री प्रीती झिंटा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. प्रीती आता सिनेमांमध्ये पुन्हा सक्रिय झाली आहे. तिचा 'बटवारा १९४७' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून, आता ती 'वाइब' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या दरम्यान प्रीती राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं. मात्र, खुद्द प्रीतीने या चर्चांवर स्पष्ट उत्तर दिलं आहे.

प्रीतीने नुकतंच तिच्या एक्स अकाउंटवर 'PZ Chat' नावाचं आस्क मी सेशन घेतलं. या सेशनमध्ये तिने चाहत्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तरं दिली. तिच्या आगामी चित्रपटांपासून ते वैयक्तिक आवडी आणि भविष्यातील योजनांपर्यंत अनेक विषयांवर चाहत्यांनी प्रश्न विचारले. याचदरम्यान एका चाहत्याने प्रीतीला भविष्यात राजकारणात प्रवेश करण्याचा विचार आहे का, असा प्रश्न विचारला. चाहत्याने तिला भविष्यात स्वतःला राजकारणात पाहतेस का, असं विचारलं. त्यावर प्रीतीने थेट उत्तर देत सध्या राजकारणात जाण्याचा कोणताही विचार नसल्याचं सांगितलं. प्रीती झिंटा गेल्या काही वर्षांपासून चित्रपटांपासून दूर होती. २०१६ मध्ये लग्नानंतर ती अमेरिकेत स्थायिक झाली आणि त्यानंतर तिने आपल्या कुटुंबावर अधिक लक्ष केंद्रित केलं. आता तब्बल आठ वर्षांच्या ब्रेकनंतर ती पुन्हा मोठ्या पडद्यावर सक्रिय झाली आहे. तिचा 'बटवारा १९४७' हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटात तिच्यासोबत सनी देओल आणि शबाना आझमी यांसारखे कलाकार आहेत. या चित्रपटानंतर प्रीती आता 'वाइब' या चित्रपटात दिसणार आहे. कुणाल खेमू दिग्दर्शित 'वाइब' हा ॲक्शन- कॉमेडी प्रकारातील चित्रपट आहे. या सिनेमात प्रीती 'मॅडम एच' नावाची भूमिका साकारत आहे.

तिचं पात्र एका गुप्त मोहिमेसाठी दोन मित्रांना तयार करतं आणि त्यांना प्रशिक्षण देतं. या भूमिकेमुळे प्रीती एका वेगळ्या अंदाजात प्रेक्षकांसमोर येणार आहे. प्रीती झिंटाला यापूर्वीही राजकारणात येणार का, असा प्रश्न विचारला गेला आहे. २०२५ मधील एका सोशल मीडिया संवादात तिने राजकीय पक्षांकडून तिकीट आणि राज्यसभेच्या जागेच्या ऑफर आल्याचा दावा केला होता आणि त्या तिने नाकारल्याचं सांगितलं होतं.

आता २०२६ मध्येही चाहत्याच्या प्रश्नाला उत्तर देताना प्रीतीने सध्या राजकारणात जाण्याचा विचार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे अभिनेत्रीच्या राजकीय प्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये तिचं स्वतःचं म्हणणं महत्त्वाचं ठरतं. दरम्यान, अभिनयासोबतच प्रीती सध्या आपल्या नव्या चित्रपटांमुळे चर्चेत आहे.

# 'सुपरकॉप'च्या भूमिकेत मोहनलाल



मल्याळी चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार मोहनलाल यांचा दृश्यम ३ हा चित्रपट यशस्वी ठरला आहे. मोहनलाल आता स्वतःचा आगामी चित्रपट 'अथिम नोहरम'वरून चर्चेत आहे. मोहनलाल यांनी या चित्रपटाचा फर्स्ट लुक शेअर करत चाहत्यांना मोठे सरप्राइज दिले आहे. या चित्रपटात मोहनलाल हे पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसून येणार आहे. चित्रपटाचा हा लुक सोशल मीडियावर गाजतोय. मागील ४ दशकांपासून चित्रपटसृष्टीवर राज्य करणाऱ्या मोहनलाल यांच्या चित्रपटावरून चाहत्यांमध्ये मोठी क्रेझ दिसून येते. अथिमनोहरम चित्रपटात मोहनलाल यांच्यासोबत जगदीश, सिद्दीकी, मनोज के. जयन, भामा अरुण आणि बीना पप्पू यासारखे अनेक दाक्षिणात्य कलाकार सहाय्यक भूमिकेत असणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन बीना पप्पू यांनी केले आहे. तर थारुण मूर्ती यांनी सहदिग्दर्शन केले आहे. मोहनलाल यांचा हा चित्रपट २४ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. त्याचसुमारास शाहरुख खानचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'किंग' प्रदर्शित होणार असल्याने बॉक्स ऑफिसवर मोठी चुरस दिसून येणार आहे.

# कंगनाचे राखीला खडे बोल

अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना राणौत पुन्हा एकदा आपल्या बेधडक वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. अभिनेत्री राखी सावंतने नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये कंगना आणि भाजप नेत्या स्मृती इराणी यांच्याबद्दल केलेल्या वैयक्तिक आणि आक्षेपार्ह वक्तव्यांवर कंगनाने जोरदार पलटवार केला आहे. कंगनाने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक लांबलचक पोस्ट शेअर करत राखीला सुनावलं आहे. कंगनाने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं की, फक्त राखीच नाही, तर असे अनेक लोक आहेत जे एखाद्या यशस्वी महिलेला पाहिल्यानंतर तिच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करू लागतात. स्वतःचा मत्सर, अपयश आणि अहंकार योग्य ठरवण्यासाठी असे लोक यशस्वी महिलांवर वारंवार वैयक्तिक हल्ले करतात. पुढे कंगनाने महिलांना अशा टीकेसमोर स्वतःला कमजोर किंवा अपमानित समजणं थांबवण्याचं आवाहन केलं. प्रत्येक वेळी स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी स्पष्टीकरण देत राहण्याची गरज नसल्याचंही तिने म्हटलं.



राखीच्या 'फेवर'च्या वक्तव्यावरही कंगनाने निशाणा साधला. कंगनाने लिहिलं, यश मिळवण्यासाठी राखीने कितीही 'फेवर' घेतले असतील, तरी त्याचा तिला काहीच फायदा झाला नाही. तिला स्वीपरची नोकरीसुद्धा मिळवता आली नाही. अशा नोकरीसाठीही काही गुणवत्ता आणि टॅलेंटची गरज असते. कंगनाने पुढे राखीवर टीका करत म्हटलं की, फेवर मिळो किंवा न मिळो, ती कुठेही जाणार नाही. त्यामुळे बसा आणि माझ्या रील्स पाहत रडत राहा. हा वाद राखी सावंतच्या एका पॉडकास्टमधील वक्तव्यानंतर सुरू झाला. या पॉडकास्टमध्ये राखीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, कंगना राणौत आणि स्मृती इराणी यांच्याबाबत लैंगिक संदर्भ असलेली आणि आक्षेपार्ह वक्तव्यं केली. या वक्तव्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. पॉडकास्टदरम्यान राखीने कंगना आणि स्मृती इराणी यांच्या राजकीय पदांबाबतही प्रश्न उपस्थित केले. तिच्या या वक्तव्यांनंतर सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आणि आता कंगनानेही त्यावर थेट प्रतिक्रिया देत राखीला उत्तर दिलं आहे.